भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना १९८१

# संपर्क

**संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ९ वे** | **एप्रिल – जून २०१३** | **अंक १ ला**

**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर** | **सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर** | **कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. हेमकिरण बाक्रे**
पुणे. ०९८५०७५४२१०

**उपसंपादक :**
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
०९९७०१७४८१८

**सहाय्यक :**
श्री. अविनाश तांबे, मुंबई : ०२२–२५२४२७०६
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव : ०९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली : ०९७६९३२९९९३
श्री. गजानन पाटगांवकर, ठाणे : ०९९६९२७६९२६
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर : ०९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर : ०२१७–२६०१४५७
प्रा. शिरीष दिलीप फडणीस, सातारा : ०९८९००४००२६
श्री. सुनील जठार, राजापूर : ०९२७०५७९४००
श्री. मिलींद पावनगडकर, कोल्हापूर : ०९२२५८००५८७
श्री. शरद खांडेकर, सांगली : ०९८२२९९५८९२
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदे : ०९२२७१३५७९४

**इतर संघांनी आपापल्या प्रतिनिधी / सहाय्यकांची नावे त्वरित कळवावी.**

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपले वर्ष ३१ मार्चला संपते, तरी आपली वार्षिक वर्गणी रु. १००/– (रुपये शंभर मात्र) (२०१३–१४ साठीची) त्वरित भरणा करावी. सदर रक्कम आपण रोख, कोणत्याही बँकेचा पुणे शाखेवर काढलेला डिमांड ड्राफ्ट किंवा पुणे येथील लोकल चेक, 'भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ' या नावाने काढून किंवा बँक ऑफ इंडिया, लक्ष्मी रोड, पुणे शाखा, खाते क्र. ०५०५११०११०००९४१० या खात्यावर जमा करून पावती खालील पत्त्यावर पाठवावी.

**श्री. हेमकिरण बाक्रे**
संपादक
द्वारा – कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०

ठाणे येथील वर्गणीदारांनी आपली वर्गणी श्री. गजानन पाटगांवकर, बेळगाव येथील वर्गणीदारांनी श्री. चंद्रशेखर जोशी, पुणे येथील वर्गणीदारांनी श्री. हेमंत पुराणिक, सातारा येथील वर्गणीदारांनी श्री. एम. व्ही.मोघे यांचेकडे जमा करण्यास हरकत नाही.

**– श्री. हेमकिरण बाक्रे**

**नियतकालिकाचे नाव** : 'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. हेमकिरण बाक्रे
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७+२९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


४ ब्राह्मणांचे एकत्रीकरण – नेमके कोणासाठी?

७ एका जिद्दीची आदर्श कहाणी !

११ छंद माझा वेगळा...

१२ पवित्र अन् रमणीय – बद्रीकेदार

१५ 'कॅन्सर माझा सांगाती'

१८ संस्थावृत्त

१९ संस्थावृत्त

२० संस्थावृत्त

२१ संस्थावृत्त

२३ संस्थावृत्त

२४ संस्थावृत्त



'संपर्क' हे नियतकालिक भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने ज्ञाती बांधवांसाठी एकवीरा प्रकाशन व प्रसिद्धीसेवा, कर्वेनगर येथे छापून, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, 'अनिश प्रासाद', ४३७, नारायण पेठ येथे प्रसिद्ध केले.


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**– संपादक**

संपर्क



# संपादकीय

आजची भोवतालची परिस्थती पाहिली तर एक अनामिक भिती मनांत येते या देशाचे, या देशातील लोकांचे काय होणार? कुठल्या अधोगतीच्या मार्गाने आज आपण जात आहोत? एवढे सगळे घडत असताना, मन बैचैन व अस्वस्थ असताना, आपण काही हालचाल करणार आहोत की आजपर्यंत जसे निष्क्रीय जीवन जगत आलो तसेच जगत राहणार?

मुंबईच्या १९९३ सालच्या बॉम्बस्फोट खटल्यांचा अगदी अलिकडेच निर्णय लागला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय योग्य की अयोग्य? आपल्या न्यायव्यवस्थेने घेतलेला २० वर्षाचा कालावधी व कदाचित त्यामुळे शिक्षेत झालेली शिथिलता. कदाचित गेल्या २० वर्षातील वातावरणांतील बदलही यांत कारणीभूत असेल पण न्यायालयाचा निर्णय अपुरा असल्याचे मान्य करुनसुद्धा त्यानंतरच्या निरनिराळ्या क्षेत्रातील प्रतिक्रियांमुळे हादरावयास झाले.

या बॉम्बस्फोटात २५७ निरपराध नागरिकांचा मृत्यु झाला. ९५० जण जखमी झाले. या आकडेवारीवरून सामान्यपणे विचार केला तरी किती कुटुंबांचे या हल्ल्यामुळे अपरिमित असे नुकसान झाले आहे याची कल्पना येते. तरीसूध्दा चित्रपट सृष्टीतील व राजकीय पक्षातील दिग्गज मंडळी संजय दत्त निर्दोष आहे म्हणून टाहो फोडतात तेव्हा आपल्या या खंडप्राय देशाचे भवितव्य किती अंधःकारमय आहे याची पुसटशी कल्पना येते व मनावर प्रचंड दडपण असल्याचे जाणवते. डॉ.अब्दुल कलाम यांची २०२० साली भारत एक महासत्ता होण्यासाठी पात्र आहे का? यांची टोचणी मनांव बोचावयास लागते.

सामान्य लोक चित्रपटसृष्टीतील तारे तारकांना देव समजतात हे मला समजत होते. पण ती मंडळी त्यांच्या देवपणामुळे कुठलाही अपराध करु शकत नाहीत असे मानणे म्हणजे देवांचाही अपमान करण्यांसारखे आहे. फक्त त्यांचा विचार करण्यापेक्षा ज्या कुटुंबांचे न भरुन येण्याइतके नुकसान झाले आहे त्यांचा विचारही या सेलिब्रेटी व राजकीय लोकांच्या मनांत येत नाही, म्हणजे किती कोत्या मनाचे हे लोक आहेत हे दिसून आले.

महाराष्ट्र विधानसभेत घडलेला प्रकार तर चक्राउनच टाकतो. आमदार, वर्दीतल्या पोलीस निरिक्षणाला विधानसभा आवारांत मारहाण करतात. त्यावर पत्रकार परिषदेत त्या प्रसंगांचे समर्थन करतात व त्यांना निलंबित करण्यापलिकडे फारशी शिक्षा होऊ शकत नाही व निलंबनसुद्धा ते लौकरच मागे घेतील यांतही मागील अनुभवावरुन शंका नाही असेच वाटते.

आमदार, खासदारांना दिलेले विशेष अधिकार अशा प्रकारे वापरले जातील याची या देशाची घटना तयार करणाऱ्या समुहाला ज्यांचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले, त्यांनाही नसावी अर्थात मला अलिकडे नेहमीच वाटत आले आहे की आपण आतापर्यंत देव जाणे असे म्हणत होतो पण आता देवच ''माणूस जाणे'' असे म्हणत असावेत. कारण देवही इतके गोंधळलेले आहेत की, त्यांनी माणूस निर्माण करुनसुद्धा, माणसाचा स्वभाव देवांच्या आकलनाबाहेर गेला आहे व तो बिचारा संभ्रमावस्थेत असल्यामुळे अवतार घ्यायचेही पार विसरुन गेलाय.

माझ्या मनांत चिंता वेगळीच आहे. आपण हे सर्व पहात, ऐकत राहून थोड्या काळानंतर सोडून देणार की यावर काही विचार करणार? काही कृती करणार? कृतीचे रुप वेगवेगळे असू शकते पण सर्वप्रथम ज्यांना हे विचार पटतात की, देशाचे भवितव्य उज्वल करणे आवश्यक आहे. त्यांनी स्वतःपासूनच या कार्यास सुरुवात करावयास हवी.

मग माझ्या विचाराला साथ देणार ना? कृती करायची तयारी करता आहात ना? कृतीचे विचार तुम्हीही कळवा. त्यानुसार आपली पुढील कृती ठरवू. मग विचार कळवताय ना? वाट पहात आहे.

# ब्राह्मणांचे एकत्रीकरण - नेमके कोणासाठी?

**अवधूत हर्डीकर**

**प्राचीन काळच्या या विचारसरणीचा परिणाम, प्रत्येक क्षेत्रामध्ये जगांत आजही ज्यांच्या विचारांचा अभ्यास होतोय, अशा बुध्दिवैभवाने तळपणाऱ्या संततीची निर्मिती होण्यात झाला. म्हणूनच पाणिनी-पतंजली-कात्यायन-भट्टोजी दीक्षित यांचे सारखे वैयाकरणी; कालिदास-बाण-भवभूती, भारवी-माया-दंडी यांचे सारखे कवी व साहित्यिक-वसिष्ठ-नामदेव-गौतम-जैमिनी-उदयनाचार्य यांचेसारखे तत्वचिंतक; बादरायण, आदिशंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, चैतन्यमहाप्रभूंसारखे श्री. ज्ञानेश्वर- संत रामदास एकनाथ यांचेसारखे श्रेष्ठ अध्यात्म विद्या- योगविद्या संपन्न आधिकारी, रामकृष्णपरमहंस - वासुदेवानंद सरस्वती रमणमहर्षि यांचेसारखे साक्षात्कारी पुरुष, चरक-सुश्रुत, शार्ङ्गधर-वाग्भट यांचेसारखे आयुर्विमा विशारद, चाणक्य-राजाजी यांचेसारखे खरे राजकारणी.. ... कात्यायनासारखा कामसूत्रकार किती किती नांवे घेऊ? हे सर्व नवविचार प्रवर्तक, समाजची खरी प्रगती दाखविणारे सन्मान्य पुरुषोत्तम ब्राह्मण वर्णातले होते. आज एकही नव-विचार प्रवर्तक भेटत नाही.**

लहानपणी आमचे बापूमामा, मुळांत स्वाभाविक वृत्ती-प्रवृत्ती स्वार्थी असल्यामुळे, इतरांना फसविण्याचे किंवा बहकावण्याचे उद्योग करणाऱ्या एका व्यक्तीची गोष्ट सांगत. त्याला, तो बसलेल्या खाटेचे खूर (पाय) किती असे कोणी विचारले; तर त्याचे उत्तर कसे असायचे? 'या, मी बसलेल्या खाटेच्या खुरांएवढे तीन!' असे उत्तर यायचे. त्याचवेळी हाताची बोटे दोन दाखवायची आणि एक डोळा मिटून एक उघडा ठेवायचा! प्रत्यक्ष त्या खाटेचे पाय, चार दिसत असतांनां त्यासंबंधी प्रश्न विचारणारा प्रश्न विचारतोय! उत्तर देणारा डोळ्यांच्या भाषेत एकच खूर असे सांगून, हाताचे बोटांनी ते दोन असे दाखवतोय. पण तोंडाने शब्द मात्र तीन असा उच्चारतोय, आणि प्रत्यक्षांत काय आहे. ते त्या चलाख व्यक्तीला माहीत आहेच आणि त्याला हेही माहीत आहे, की मी जे काही बोलतोय दाखवतोय, त्यावर हा भाबडा माणूस विश्वास ठेवणारच! आणि तो प्रत्यक्ष वस्तुस्थितीपेक्षां, माझा उच्चारलेला शब्द, हावभावामुळे प्रतीत होणारा अर्थ, डोळ्यांसारख्या प्रभावी साधनानी दाखविला जाणारा अर्थ, या सर्वांकडे त्याचे लक्ष जाणार आहे आणि तो पुरता गोंधळलेला राहणार आहे. समाजातल्या अशा भाबड्या लोकांचे, परिस्थितिजन्य गोंधळलेपण, हे तथाकथित चलाख लोकांचे चराऊ कुरण असते. हा त्या गोष्टीचा सारांश आमच्या डोक्यात लगेच उतरत असे.

प्रत्यक्ष प्रचाराचे वेळी केला जाणारा प्रचार आणि एरवीच्या काळात अशाच लोकांचे प्रत्यक्षवर्तन यांचे लखलखीत अनुभव, अनेकदा घेतल्यानंतर ही गोष्ट वारंवार आठवते.

अक्षरश: सहस्त्र वेळेला अशा चलाख,स्वार्थ लंपट, कधीही मनाने स्वच्छ नसलेल्या, अहंकारी, तत्व पालनाचा आव आणणाऱ्या, परनिंदा-मत्सरग्रस्तता- असूया यांचे ढीग परंपरेने सांभाळत आलेल्या, हेतूंचा विपर्यास करण्यात तरबेज, फायदा असेपर्यंतच संबंध ठेवणाऱ्या, भांडखोरपणाचे व्यसनच लागलेल्या, भावनांचे भरकटलेपण कवटाळणाऱ्या, स्वकेंद्रीत वृत्ती व प्रवृत्तीच्या, दुसऱ्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याच्या कलेमध्ये तरबेज, नकारात्मक विचारांच्या आणि उदासवाणे जिणे पसंद असणाऱ्या, सोयीने स्वाभिमान प्रकट करणाऱ्या, उसनवारी-भारवाही-लादलेली- अनुकरणातून आलेली बुध्दी व ती ती घृणायुक्त मानसिकता जोपासणाऱ्या, ढोंगीपणाचे पोशिंदेपण जपणाऱ्या... .. आपल्या शेकडो लोकांशी, माझे संबंध आले. शारीरिक वर्ण गोरेपणाचा असला तरी, त्याच्या विरोधातले अंत:करण जोपासणाऱ्या व्यक्तींच्या वरलिया रंगाला भुलून मी अनेकदा व्यवहारी जीवनांत सपशेल आपटलो; पण तरीही खाटेचे पाय किती हे दिसत असूनही, समोरचा माणूस त्या विशेष गुणांनी युक्त आहे, हे ढळढळीतपणे कळत असूनही, मी त्याच्या नाटकी कथनावर विश्वास ठेवत आलो आहे. त्याच्या प्रत्येक हाळीला सकारात्मक उत्तर देत बाहेर धावलो आहे.

याबाबतीत आमच्या पूर्वजांनी खूप विचार प्रग़ट केलेले आहेत. मुळात ब्राह्मण कोणाला म्हणावे? तो कोणत्या विशिष्ठ गुणांनी युक्त असतो?.. .. ''यासंबंधी वसिष्ठ गौतम-यांसारख्या चिंतनशील ऋषींनी त्यांच्या धर्मसूत्रांमध्ये या संबंधी आपले विचार मांडलेले आहेत.'' त्यांच्या कल्पनेतला खरा ब्राह्मण कसा होता?.. .. चिंतनशील वृत्ती-प्रवृत्तीचा, वस्तूंची हाव नसल्यामुळे आणि कोणापासून काही मिळवायचे नसल्यामुळे शांत स्वाभावाचा, इंद्रियांवर ताबा असलेला, पापी विचारांपासूनही सहस्त्र मैल दूर, वासनांचा बळी न झालेला, स्वार्थ पूर्णपणे संपलेला, दया-कारुण्य या सद्गुणांचे नाटक न करणारा, शुद्ध मनाचा, दैन्य-दारिद्र्य यांचे प्रदर्शन न करणारा, परनिंदा-मत्सर- असूया वगैरे दोषराशींपासून पूर्ण मुक्त असलेला, संयमी, बुद्धी व विद्या यांनी संपन्न, सुस्वभावी असणे आवश्यक होते. सद्गुणांचे लोकांना उपदेश नव्हे तर; त्यांचे स्वत:चे आचरण होते. अशा लोकांच्या आचरणातून इतर लोकांचे तसे आचरण होते. समाजातल्या अनेक लोकांना चांगले काय वाईट काय ते कळत असतेच आणि सामान्यपणे लोक चांगल्याचेच आचरण करतात आणि खऱ्या चांगल्या लोकांचा प्रभाव त्या त्या समाजावर त्याच्या वर्तणुकीवर पडत असतो. एक प्रकारे सद्विचारांचे वर्तनात दिसून येणारे प्रकटीकरण, समाजाची अवस्था व दर्जा दाखवीत असतात; आणि साहजिकच अशा लोकांवर चांगल्या वर्तनाची जबाबदारी जास्त असते. मनुस्मृतीमध्ये एखाद्या अपराधाकरितां वरच्या वरच्या वर्णांना खालच्या वर्णाला दुप्पट

दंड करायला सांगितलेला आहे. म्हणजे एखाद्या 'क्ष' अपराधासाठी शूद्राला दहा रुपये दंड ठोठावला, तर ब्राह्मणाला ऐंशी रुपये दंड त्याच अपराधासाठी सांगितलाय. पुढारी, सुशिक्षित, सुसंकृत व्यक्तीने केलेला अपराध अधिक दंडनीयच हवा. ही व्यवस्था बरोबरच होती; असे आज प्रकर्षाने वाटते.

प्राचीन काळच्या या विचारसरणीचा परिणाम, प्रत्येक क्षेत्रामध्ये जगांत आजही ज्यांच्या विचारांचा अभ्यास होतोय, अशा बुध्दिवैभवाने तळपणाऱ्या संततीची निर्मिती होण्यात झाला. म्हणूनच पाणिनी–पतंजली–कात्यायन–भट्टोजी दीक्षित यांचे सारखे वैयाकरणी; कालिदास–बाण–भवभूती, भारवी–माया–दंडी यांचे सारखे कवी व साहित्यिक–वसिष्ठ–नामदेव–गौतम–जैमिनी–उदयनाचार्ययांचेसारखे तत्वचिंतक; बादरायण, आदिशंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, चैतन्यमहाप्रभूंसारखे श्री. ज्ञानेश्वर– संत रामदास एकनाथ यांचेसारखे श्रेष्ठ अध्यात्म विद्या– योगविद्या संपन्न आधिकारी, रामकृष्णपरमहंस – वासुदेवानंद सरस्वती रमणमहर्षि यांचेसारखे साक्षात्कारी पुरुष, चरक–सुश्रुत, शार्ड्.गधर–वाग्भट यांचेसारखे आयुर्विमा विशारद, चाणक्य–राजाजी यांचेसारखे खरे राजकारणी.. ... कात्यायनासारखा कामसूत्रकार किती किती नांवे घेऊ? हे सर्व नवविचार प्रवर्तक, समाजची खरी प्रगती दाखविणारे सन्मान्य पुरुषोत्तम ब्राह्मण वर्णातले होते. आज एकही नव–विचार प्रवर्तक भेटत नाही. पुराणकाळापासून आणि इतिहास ग्रंथांतून ब्राह्मणांना, अनेक प्रकारचे विरोध सहन करावे लागत होते हे दिसते. आज कर्तबगार, गुणवान ब्राह्मण व्यक्ती निवडून येणे कठीण झाले आहे. आज जातिवाद उपजातिवाद, जमातवाद यांना ऊत आलाय. ब्राह्मणांना एकत्र होण्याचे आवाहन करण्यात येत असलेल्या या काळातच ''शिवछत्रपतींवर अभिषेक करायला नकार देणारे, दलितांवर अन्याय करणारे आम्ही नव्हतो'' असे स्वच्छपणे वृत्तपत्रांतून लिहिणारे ब्राह्मणच आहोत ''ठ्ठ्ठ चे धुरीणत्व कोणाकडे होते ते पहा.'' असे त्याच लेखांत म्हटलेले आहे. तेव्हां ब्राह्मणांनी एकत्र येण्याची काळाची गरज आहे. अशी हाकाटी करण्यामागे कोण आहेत? त्यांचा हेतू समजायला हवाय. कांही दशकांपूर्वी आतां ब्राह्मणसंघांची गरज नाही. असे सांगून गुंडाळलेल्या एका ब्राह्मण संघाचे आज पुनरुज्जीवन करावे लागले आहे. आपले पिढ्यानुपिढ्या प्रतिस्पर्धी असलेल्या उपजातीतल्या ख्यातनाम व्यक्तीला मिळू शकणारे पारितोषिक त्याला कसे न मिळेल, या करतां नेम पल्लवी करपल्लवी–फोन पल्लवी –ईमेल.. .. सर्व प्रकारचे प्रयत्न होताहेत. असं का व्हावं? याचा विचार करतांना, कालौघात ब्राह्मणांनी कमावलेले वर तिसऱ्या परिच्छेदात दिलेले, ढिगांनी असलेले दोष मला दिसून आले. विघटन हे त्याला जबरदस्त कारण! त्याचा इतिहास काळापासून चा ढासळता स्तर, अनेकांच्या कुपोषित अहंकारांमुळे, स्वत:विषयीच्या वास्तवात नसलेल्या कल्पना करीत रहाण्यामुळे वाढला. गोबेल्स प्रचारतंत्रामुळे प्राप्त झालेल्या तथाकथित पुढारपणाची सूज सांभाळण्याऱ्या ईर्षेमुळे हे होते.

विघटनांचा ढासळता स्तर केवळ, उपजातीमधूनच धारदार स्वरुपाचा आहे असे नव्हे; तर त्या उपजातींमध्येसुध्दां ''आम्ही गांवाचे प्रमुख, खोत म्हणून आम्ही श्रेष्ठ''! ''आम्ही त्या काळचे मॅट्रिक म्हणून श्रेष्ठ!'' ''आम्ही स्वयंपाकी किंवा भिक्षुक नाही म्हणून श्रेष्ठ'' असे सतत आक्रमक पद्धतीने सांगणारे, दुसऱ्याचा पाणउतारा, घोर अपमान कधी थेट, कधी व्यंग्यार्थाने, कधी कुजबुजीने, कधी आगळ्या वेगळ्या छुप्या प्रकाराने करणारे ब्राह्मणच आहेत. यातूनच मग दुतोंडीपणाचे ओंगळवाणे स्वभाव दर्शन होते. कोणत्या बँका आता आपल्याच ताब्यात आहेत, याची रसभरीत वर्णने करुन, आपल्या लोकांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करायचे; त्यांची पाठ थोपटायची आणि त्याच बँकांची दिवाळखोरी त्याच चलाख, बुद्धिमान लोकांच्या उपद्व्यापांनी झाल्यावर ती RSS वाल्यांची मॅनेजमेंट होती! असे बेधडक लिहायचे. दुर्गा भागवत – सुरेश भट हे आमचे म्हणून सोयीने केव्हां म्हणायचे व त्यांना एखादे अॅवार्ड मिळतेय हे समजल्याबरोबर, ते आपले नाहीयेत संबंधितांना भराभरा कळवायचे. हे सर्व काही ज्या काळात, सतत या ना त्या स्वरुपात दिसते त्याच काळात, ''ब्राह्मणांची संघटना काळाची गरज, यावर बोलायला तयार ही व्हायचे.'' ही नाटकं आपण कोठवर चालवणार? की चलाख मखलाशी, दांभिकता, दुसऱ्यावर वरताण करीत रहाण्याची इच्छा, खोटारडेपणा आपण असेच कोठवर, कोणासाठी जोपासणार?

क्रमशः

## 'अ' आयुष्याचा

अ– अवलंबून असणाऱ्या काळाचा
अ– अवखळपणा नसान्सात भिनवणारा
अ– अजाणतेपणी जाणतेपणा आणवून देणारा
अ– आयुष्याचे ध्येय ठरवण्याचा
अ– अध्ययन पूर्ण होण्याच्या वाटेचा
अस्मिता निर्माण करणेचा।।
अविरत कष्ट करण्याचा
अखंड ध्यास धरण्याचा ।।
अ – अक्षता डोक्यावर पडण्याचा
आप्त, गणगोत वाढवण्याचा
अगणित नाती निर्माण करण्याचा
असंख्य गोष्टींचा ठेवा वाढवण्याचा ।।
अशा या 'अ' चा
आलेख असतो कच्चा बच्चा ।।
अनादिपासून अनंतापर्यंत 'अ'
'अ' आनंदाचा सुखात
'अ' अश्रुंचा दु:खात ।।
'अ' अक्कलेचा आणि अक्कलहुशारीचा
'अ' आडमुठेपणातून निर्माण होणाऱ्या अडचणींचा ।।
'अ' अखेर आहे तो आईचा
अनंत कोटी ब्रम्हांडनायकाचा ।।

**सौ. शुभांगी पळसुले**
**मो.९८५०६४११२०**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# एका जिद्दीची आदर्श कहाणी !

**गिरीश कल्लेद, बेळगाव**

**शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानेच सुचित्रा आज तिच्या पायांवर उभी राहू शकते. मात्र आजही तिचा उजवा गुडघा वाकत नाही. दोन्ही पायांमध्ये सव्वा इंचाचा फरक आहे. तरीही केवळ जिद्दीच्या जोरावर तिने आपले शालेय शिक्षण 'एम. व्ही. हेरवाडकर इंग्लिश स्कूल' व महाविद्यालयीन शिक्षण 'गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स' आणि कायद्याचे शिक्षण आर.एल.लॉ कॉलेजमध्ये पूर्ण केले आहे.**

**मूकं करोति वाचालम्
पंगूं लंघयते गिरीम...**

असे संस्कृत सुभाषित आहे. बेळगावच्या एका तरुणीबद्दल ते सार्थ वाटते.

स्वत:च्या पायावर उभे राहणे अवघड असताना शारीरिक अपंगत्व घेऊन, आयुष्य जगताना काय वेदना होतात, हे त्यांनाच ठाऊक! मात्र आपल्या अपंगत्वाचा कोठेही आणि कसल्याही प्रकारचा बाऊ न करता, तसेच याबाबत कधीही कमीपणा न मानता स्वत:च्या पायावर उभे राहणारे कितीतरी अपंग बांधव समाजामध्ये आहेत. विविध क्षेत्रात कार्यरत राहून आपणही काही मागे नाही, याची प्रचिती ते देत असतात. परंतु स्वत: अपंग असूनही दुसऱ्यांना आधार देणारे विरळाच! अशीच एक अपंग तरुणी बेळगावात असून, तिने एका अनाथ तान्हुल्यास दत्तक घेतले आहे. त्याच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी तिने स्वत:च घेतली असून, समाजासमोर आदर्श ठेवला आहे. 'सुचित्रा हेमंत बोंद्रे' असे या जिद्दी तरुणीचे नाव आहे.



सोहम सुचित्रा बोंद्रे

**नऊ महिन्याची असताना शस्त्रक्रिया**

राणी चन्नमानगर, टिळकवाडी येथे वास्तव्यास असणाऱ्या या तरुणीने बी.कॉम., एल.एल.बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आरपीडी कॉलेज आवारात असणाऱ्या युनियन बँकेमध्ये 'कॉम्प्युटर टर्मिनल ऑपरेटर' (सीटीसी) म्हणून सेवा बजावत आहे. शालेय जीवनापासून हुशार विद्यार्थिनी म्हणून ती ओळखली जायची. विविध स्पर्धा-परीक्षांमध्ये नेहमीच तिने उज्ज्वल यश मिळविले. यामुळे शाळेतील शिक्षक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्गाचीही तिच्या यशाबद्दल कौतुकाची थाप मिळायची. जन्मानंतर तिचा उजवा पाय (पाऊल) जमिनीला वरची बाजू टेकलेल्या स्थितीत पूर्ण उलट होता. हिपजॉईन्टच्या ठिकाणी नैसर्गिक खोबण नसल्याने, तो जॉईन्ट डिसलोकेशन स्थितीतच होता. यामुळे नऊ महिन्याची असताना तिच्या पायावर पहिली शस्त्रक्रिया करण्यात आली. सांगलीचे सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. धनपाल अरवाडे यांनी ही अवघड शस्त्रक्रिया केली. यावेळी तिच्या दोन्ही पायांना कमरेपासून प्लास्टर घालण्यात आले होते. त्यानंतर अडीच वर्षांची असताना 'हिप जॉईन्ट'ची गुंतागंतीची शस्त्रक्रिया सांगली येथे करण्यात आली. ही अवघड व आव्हानात्मक शस्त्रक्रिया डॉ. अरवाडे आणि मुंबईचे डॉ. पांबोर यांनी यशस्वीरीत्या केली. यासाठी तब्बल सहा तास लागले. यावेळीही तिला तीन महिने स्पायका प्लास्टरमध्ये राहावे लागले.




सुचित्रा हेमंत बोंद्रे

**शाळा कॉलेज सायकलने !**

शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानेच सुचित्रा आज तिच्या पायांवर उभी राहू शकते. मात्र आजही तिचा उजवा गुडघा वाकत नाही. दोन्ही पायांमध्ये सव्वा इंचाचा फरक आहे. तरीही केवळ जिद्दीच्या जोरावर तिने आपले शालेय शिक्षण 'एम.व्ही. हेरवाडकर इंग्लिश स्कूल' व महाविद्यालयीन शिक्षण 'गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स' आणि कायद्याचे शिक्षण आर.एल.लॉ कॉलेजमध्ये पूर्ण केले आहे. तेही दुचाकी सायकलवरुन हे विशेष ! पाचवीपासून ते गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्समधील शेवटच्या वर्षापर्यंत ती सायकलनेच ये-जा करीत असे. केवळ सायकलिंग करूनच न थांबत, ती पोहायलाही शिकली. रोज सकाळी दोन किलोमीटर वॉकिंगचा सरावही आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच हे सर्व शिकल्याचे सुचित्राने सांगितले. सायकलिंग तसेच पोहण्याने पायाची ताकद वाढण्यास मदत झाली. या कामी आईबाबांचे, शिक्षक तसेच वर्गमैत्रिणींचेही मोलाचे सहकार्य मिळाल्याचे तिने सांगितले.

मात्र अपंगत्वाची भावना, त्याबद्दल न्यूनगंड वाटण्याचे कोणतेही कारण नसल्याचे तिचे म्हणणे आहे. नेहमी हतसमुख राहणारी, पुस्तके वाचण्याची आवड तसेच गायन स्पर्धेत भाग घेण्याची जिद्द आणि चिकाटी सर्वसामान्यांना थक्क करणारी आहे. हिंदी प्रचार सभेच्यावतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा, दासबोध, परिसंवाद


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी कॅटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल.
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

स्पर्धेत तिने यश संपादन केले आहे. २००४–०५ मधील 'श्रॉफ चषकाची' ती मानकरी ठरली आहे.

**संगणकात प्रावीण्य**

संगणकामध्येही तिने विशेष प्रावीण्य मिळविले असून, युनियन बँकेत कॉम्प्युटर टर्मिनल ऑपरेटर म्हणून गेल्या पाच वर्षापासून सेवेत आहे. अन्य बँकांतील काही अधिकारी बऱ्याच वेळा, कॉम्प्युटर टर्मिनलबाबत तिचा सल्ला घेत असतात. बँकेचा स्टाफ, व्यवस्थापक आदींचे सहकार्य नेहमीच मिळत असते. बँकेत काम करत असतानाही बँकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या हिंदी परीक्षांमध्येही तिने पुरस्कार पटकावले आहेत. २००९–१० च्या हिंदी दिनानिमित्त घेण्यात आलेल्या परीक्षेत 'आंतरशाखा राजभाषा पुरस्कार' तिने मिळविला आहे. राजभाषा विभाग, क्षेत्रीय कार्यालयाच्यावतीने ही स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते.

**३४ मधून निवड**

युनियन बँकेत नोकरीसाठी सुचित्रा अपंगांसाठी असणाऱ्या विशेष कोट्यातून परीक्षा उत्तीर्ण झाली. बेंगळूर येथे ही परीक्षा घेण्यात आली होती. यात राज्यभरातून ३४ उमेदवार बसले होते. यामधून सुचित्राची निवड झाली आणि सुमारे पाच वर्षापासून ती कार्यरत आहे.

**कायदा सल्लागारही.....**

सुचित्रा बोंद्रे हिच्या यशाबद्दल आणि हुशारी पाहून 'लोकमान्य मल्टिपर्पज को–ऑप' सोसायटीचे संस्थापक चेअरमन किरण ठाकूर यांनी तिला आपल्या सोसायटीत कामाची संधी दिली. 'लोकमान्य'च्या मुख्य शाखेत तिने कायदा सल्लागार म्हणून सुमारे ८ महिने काम पाहिले आहे. याबद्दल किरण ठाकुर यांच्याबद्दल सुचित्रा नेहमी कृतज्ञता व्यक्त करते.

आई–वडिलांनी तिच्या लग्नाचा विचार केला आणि त्या दिशेने प्रयत्नही करुन पाहिले. परंतु जमून आले नाही. यामुळे पुढील जीवनासाठी 'आधार' म्हणून मुलाला दत्तक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सुचित्राने यासाठी तयारी दर्शवली. मिरज येथील 'पाठक अनाथाश्रमा'मधील चार महिन्यांच्या तान्हुल्याला दत्तक घेऊन 'सोहम' असे नामकरण करण्यात आले. चांगले काम केल्याचे समाधान आणि एका अनाथ बालकास घर देऊन, त्याच्या जीवनाला खरी दिशा देण्याची जबाबदारी तिने उचलली आहे. हीच खरी सामाजिक बांधिलकी म्हणायला हवी.


WITH BEST COMPLIMENTS FROM

मे. डी.व्ही. भाटवडेकर

६४०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,

क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. – २४४५६०४७

१९१७ पासून अहर्निश सेवा



सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!





फणसळकर

कोंकण काजू

उत्पादक :

कोकण काजू    सांडगी मिरची

फणस–तळलेले गरे    काजूकतली

प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर

मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३–६५६२५१



With Best Compliments From

Happy Home Services

Consultant for Real Estate

S.S. Naphade

Ph. 25882893

Mobile : 9422302641

Deals in outright Purchase / Rental of Bungalows, Flats, Shops, Plots & Property

Bldg. No. B-3, Flat No. B-6, Chintamaninagar, Anand Park, Aundh, Pune - 411 007.



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?



आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.

**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# छंद माझा वेगळा...

**शब्दांकन : महेश खरे**

(क्रमशः पुढे चालु)

> **मुंबईतील फोर्ट विभागातील संघवी वॉच कंपनी, या दुकानात घड्याळाची आतील रचना दाखविणारे 'ऑरिस' या जर्मन कंपनीचे एक यंत्र होते. मी नेहमी त्या दुकानात जाऊन ते विकत मिळेल का अशी चौकशी करत असे. त्यांच्याकडून नेहमीच नकारघंटा मिळत असे. जवळजवळ तीन–साडेतीन वर्ष हा प्रकार सुरु होता. एके दिवशी त्या दुकानाच्या मालकाने मी दुकानात शिरल्यावर मला बोलावून घेतले.**

लग्न करतानाही होणाऱ्या पत्नीला या छंदाविषयी आधी सांगितलं आणि माझं घड्याळांवर असलेलं पहिलं प्रेम मान्य असेल, तरच लग्नाला हो म्हण अशी अट घातली. तिनेही ती मान्य केली आणि आजपर्यंत माझ्या छंदाला प्रोत्साहनच दिलं. एकलव्याप्रमाणे मिळवलेले माझे घड्याळ दुरुस्तीचे ज्ञान मी इतरांना शिकवायला सुरुवात केली. माझ्या शिकवण्याच्या हातोटीमुळे एकावेळी ५०–५० विद्यार्थी माझ्याकडे घड्याळ दुरुस्ती शिकत असत. आजपर्यंत ९००० हून अधिक विद्यार्थी माझ्याकडे शिकून गेले आहेत.

मुंबईतील फोर्ट विभागातील संघवी वॉच कंपनी, या दुकानात घड्याळाची आतील रचना दाखविणारे 'ऑरिस' या जर्मन कंपनीचे एक यंत्र होते. मी नेहमी त्या दुकानात जाऊन ते विकत मिळेल का अशी चौकशी करत असे. त्यांच्याकडून नेहमीच नकारघंटा मिळत असे. जवळजवळ तीन–साडेतीन वर्ष हा प्रकार सुरु होता. एके दिवशी त्या दुकानाच्या मालकाने मी दुकानात शिरल्यावर मला बोलावून घेतले. मी माझ्या छंदाविषयी सांगून, माझ्या विद्यार्थ्यांना घड्याळाची रचना दाखविण्यासाठी ते यंत्र विकत मिळेल का असे विचारले. तेव्हा ते म्हणाले, ''मी हे यंत्र विकणार नाही''. मी निघण्यासाठी वळलो, तेव्हा त्यांनी मला थांबवून सांगितले की, मी ते यंत्र तुम्हाला भेट म्हणून देणार आहे. मला आनंदाश्चर्याचा धक्काच बसला. एवढंच नव्हे; तर त्याने या यंत्राबरोबर सुमारे दीड फुट उंचीची आणखी दोन घड्याळे मला स्वत:च्या गाडीतून घरपोच आणून दिली. अशाच प्रकारे पुण्याच्या प्रभात वॉच कंपनीत एक वाळूचे घड्याळ होते. ते मिळण्यासाठी दोन अडीच वर्ष पुण्याला गेल्यावर मी त्या दुकानात जात असे. एकदा मी त्या दुकानात नेहमीप्रमाणे शिरल्यावर त्याचे मालक म्हणाले की, तुम्ही इतके दिवस ते घड्याळ मागत होता, तेव्हा तुम्हाला दिलं असतं तर बरं झालं असतं. आमच्या नोकराकडून साफ सफाई करताना ते घड्याळ पडून फुटलं. असं करत करत माझ्याकडे घड्याळांचा संग्रह वाढतच होता. १९७४ साली दूरदर्शनवरील सुहासिनी मुळगांवकर आणि भक्ती बर्वे यांनी माझ्या या छंदाविषयी माझी मुलाखत घेतली. ही मुलाखत बघून 'नवशक्ती' या वर्तमानपत्राच्या कै. पु.रा बेहरे यांनी अर्धे पान लेख छापण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे दोन वर्षे ही लेखमाला सुरु होती. ते बघून सुप्रसिद्ध प्रकाशक कै. तुकाराम कोठावळे यांनी या विषयावर पुस्तक प्रकाशित करण्याचा प्रस्ताव दिला आणि घड्याळ दुरुस्ती या विषयीची माझी मराठीत दोन आणि हिंदीत एक पुस्तक तयार झाले. नोकरी व इतर निमित्ताने मी भारतभर फिरलो आणि तेथील घड्याळे गोळा केली.

माझ्या या संग्रहात साडे तीनशे वर्षे जुन्या घड्याळापासून ते आधुनिक एल.इ.डी. डिस्प्ले असणाऱ्या व वेळ, तारीख याबरोबरच विविध मजकूर बदलता येणाऱ्या घड्याळापर्यंत विविध प्रकारची घड्याळे आहेत. अंगठीतील घड्याळापासून दोन–अडीच फुटी लंबकाच्या घड्याळापर्यंत आणि फुलझाडीतील घड्याळ, वाळूचे घडयाळ, सावलीचे घड्याळ अगदी कमोडमधील घड्याळ तसेच जोड्याच्या आकाराचे घड्याळ अशी विविध आकारांची व प्रकारची घड्याळे आहेत. माझ्या दादरच्या दोन खोल्यांच्या घरातील सर्व भिंती घड्याळांनी भरलेल्या आहेत. लोकांना या विषयाची माहिती व्हावी यासाठी, मी कालदर्शन या नावाचा एक कार्यक्रम करतो. त्यात घड्याळाची इतिहास आणि दोरीच्या, सावलीच्या, वाळूच्या घड्याळापासून आत्तापर्यंत झालेली त्याची प्रगती चित्रांच्या मदतीने मनोरंजक रीतीने सांगतो. या घड्याळांचे एखादे कायम स्वरूपी संग्रहालय असावे, तेथे ही सर्व घड्याळे वर्गवारीने मांडलेली असावी व अबालवृद्धांना हा संग्रह बघता यावा! अशी माझी इच्छा आहे. परंतु त्यासाठी सरकार किंवा मोठ्या संस्थेचे पाठबळ मिळणे आवश्यक आहे. अजूनही मी घड्याळे जमवतो, दुरुस्त करतो आणि लोकांना घड्याळ दुरुस्ती शिकवतो. हा वारसा पुढील पिढीत माझ्या मुलाने जपला आहे. माझी पत्नी, मुले, सूना, नातवंडे यांच्या पाठिंब्यावर माझ्या छंदाच्या घड्याळाची 'टिक टिक' सुरु आहे.

# पवित्र अन् रमणीय - बद्रीकेदार

**डॉ. गायत्री यल्लापूरकर, ९७४२०२१३५९**

**(क्रमशः पुढे चालु)**

आल्यावर पिठ्ठूकडचे सामान रुममध्ये उतरून घेऊन त्याचे, पैसे दिले. डिंक व दाण्याचे कुटाचे लाडू भरलेला बॉक्सही दिला तर खूष झाला. मग गारेगार पाण्याने फ्रेश होऊन गरमागरम चहा घेतल्यावर जरा बरे वाटले. खूप खूप दमलो होतो त्यामुळे बाहेर फिरायला जावेसे वाटेना. संपूर्ण रेस्टहाऊसच्या परिसरात १०/१२ फूटाचे बर्फाचे ढिगच्या-ढिग साठले होते. त्यांनीच आमच्या खोल्या वेढल्या गेल्या होत्या. दुपारी चालताना उतरवलेले सारे गरम कपडे-हातमोज्यासकट दिमाखात अंगावर चढवून मिरवू लागले तरी थंडी जाईना। २/३ पंडे येऊन आपली कार्डस् देऊन गेले. मग ४-५ कि.मी. चालल्यावर ' अदृश्य' झालेली अमृता आली. ती पुढे घोडा करून आली म्हणून १२-१२॥ लाच पोचली म्हणे. पैसे (पिठ्ठूचे) देऊन सामान घेऊन गेली. मागच्या बाजूला बर्फाची पठार खुणवत होती. तेथेच जरा दूर हेलीपॅडवरची हेलीकॉप्टर्स दिसत होती. खरंतर मंदिरात (केदारनाथ) पण जायचं होतं. पण खूप म्हणजे खूप दमल्याने रुममध्येच गादीसारखी जाड दुलई+ब्लँकेट घेऊन गादीवर लोळण घेतली. तास/दिडतास झोपल्यावर मग जरा बरे वाटले. थोडे फोटो काढले. आमच्या बरोबरचे सगळेजण लवकर आले होते अन् खोल्यांमध्ये गुडुप झाले होते. मग रात्री लवकरच जेवून आम्हीपण लवकर झोपलो. मी मोहरी+तिळ तेलांचे मिश्रतेल बरोबर नेले होते. ते आता रोज पायांना व हाताला लावत होते. (त्यामुळे की काय १-२ डिग्री तपमान व खूप चालूनही पायात गोळे आले नाहीत की पाय आखडले नाहीत. (गुडघे इत्यादि सांधे). पाय दुखले मात्र खूप. विशेषतः चालताना जाणवत होते. हे पुढे २/३ दिवस जाणवले. सकाळी लवकर उठून ठी. ३०/- बादली दराने गरम पाणी घेऊन स्नान केले. देवळात गेलो. मोठ्ठीच्या मोठी रांग होती. आम्हाला लवकर जायचे असल्याने 'पंड्याचा' वशिला लावून आत गेलो. पूजेसाठी त्याने ८००/- रुपये घेतले. पूजेचे सामान आमचेच. हे शिवलिंग नेहमीच्या शिवलिंगाच्या आकाराचे नसून, बैलाच्या वशिंडाच्या (पाठीवरचे टेंगूळ) आकाराचे आहे. महाभारत-युध्द झाल्यावर पांडवाना 'श्री. व्यासगुरुंनी' त्यांच्या हातून झालेल्या खूप हत्यांचे पाप नष्ट व्हावे म्हणून भगवान श्री. महादेवाचे आशिर्वाद घेण्यास सांगितले. पांडवांनी महादेवाची आराधना केली व त्याला भेटण्यासाठी केदारनाथला आले. शंकराने बैलाचे रुप घेतले व तिथे चरणाऱ्या बैलांच्या कळपात सामिल झाला. भीमाने प्रत्येक बैलाला आपल्या पायाच्या ढांगेखालून नेण्याचा क्रम सुरु केला; पण एक बैल मात्र ते चुकवत होता असे त्याच्या लक्षात आले. त्याला शंका आली अन् त्या बैलाला धरण्यासाठी त्याने त्याचे वशिंड हाती धरले. तत्क्षणी महादेव भूमीत गुप्त झाले व ते वशिंड मात्र जमिनीवर राहिले. मग पांडवांनी खूप-खूप आळवणी केल्यावर महादेवाने त्यांना दर्शन देऊन पापमुक्त केले. त्यांनीच प्रार्थना केल्यावर कायम या जागी वास्तव्य करेन असे सांगितले. त्यामुळे हे जागृत स्थान मानले आहे. (बैलाचे उरलेले अवयव विविध ठिकाणी बाहेर आले - ५ स्थाने आहेत. त्यांना पंचकेदारच म्हणतात.) हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. पांडवांच्या मूर्तीही इथे आहेत. जुन्या पांडवकालीन मंदिराचा जीर्णोध्दार श्रीआदीशंकराचार्यांनी केला. त्यांचेही मंदिर आहे. पंड्याने अगदी हात लावून - अभिषेक करुन पूजा करवून घेतली. येथे पिंडीला तूप लावण्याचे विशेष महात्म्य आहे म्हणून ते पण लावले. (विषाचा उतारा म्हणून म्हणे. आयुर्वेदाप्रमाणेही गाईचे तूप विशेषतः विषघ्न मानले आहे.) मंदिरात मन मात्र खूपच प्रसन्न व शांत झाले आहे असे जाणवते. मग नाश्ता उरकून परत उतरायला सुरुवात केली; तेव्हां पावणेदहा वाजले होते. यावेळी उतरायचेच असल्याने सॅक पाठीवर घेऊन उतरलो. हाशहुश करत-पावलांना ब्रेक लावत गौरीकुंडला पोचलो तेव्हां २॥ वाजून गेले होते. मग गौरीकुंडच्या ऋ्रतछ च्या रेस्टॉरन्टमधे गेलो; तेव्हां आम्हालां १ तास उशीर झाल्याने उरलेले सगळे; जेवून पुढे गेले आहेत व फक्त गाईड छोटी गाडी घेऊन आमच्यासाठी थांबला आहे असे कळले. मग कसले जेवण अन् काय। धावतपळत गाईड व गाडीला गाठले. खरं तर चालल्याने खूपच भूक लागली होती. जवळचे शेंगदाणे आम्ही खाल्ले. अमृता यावेळी चालत पूर्ण उतरून आली. ती, गाईड /ड्रायव्हर साऱ्यांनी दाणे खाल्ले. रामपूरच्या गेस्टहाऊसमधे जाऊन आमचे सामान ताब्यात घेऊन गाडीत ठेवले. पुढे वाटेत गुप्तकाशीला एका ठिकाणी थांबून गारगार समोसे व चहा घेतला अन् भूकेमुळे ते सारेच फारच चविष्ट लागले. संध्या ४॥ वाजता रुद्रप्रयागला पोचलो. येथेच परवा आम्ही संगम पाहून जेवण घेतले होते. आता येथे आज मुक्काम होता. आम्ही तिघेही चालताना जरा लंगडतच होतो पण केदारनाथला 'चालत' जाण्याची मोहीम फत्ते झाल्याचा आनंद मनात झिरपत होता.



**बद्रीकेदार**

आज '११ मे'. सकाळी ५-५॥ पर्यंत आवरुन चहा घेऊन ६ वाजता बद्रीनाथकडे जाण्यासाठी गाडीत बसलो. रुद्रप्रयागहून एका वेगळ्या वळणाच्या रस्त्याने गाडी बद्रीनाथच्या रस्त्याला लागली. एकेरी वाहतुकीचा हा रस्ता ड्रायव्हरच्या कौशल्याची परिक्षा घेणारा-खडबडीत-नागमोडी- अरुंद होता. मधे 'गौचर' ला नाश्ता केला. गाईंची चरण्याची जागा म्हणजे 'गौचर'! याविषयीची कथा अशी - एक राणी ह्या यात्रेसाठी जात असताना तिने पाहिले की, एक शेतकरी त्याच्या शेतात घुसलेल्या गाईला जोरात मारत होता. तिने त्याला बोलावून 'गाईला मारु नको' असे सांगितले. तर तो म्हणला की,

गाईने शेत खाल्ले तर तो त्याच्या कुटुंबाची गुजराण कशी करणार? वाटल्यास राणीने त्याचे शेत विकत घ्यावे व त्यामधे गाईला चरायला सोडावे. राणीच ती! तिने त्याचे व इतरांचेही शेत विकत घेतले व ती जागा ‘गाईंना चरण्यासाठी ’ मोकळी सोडली म्हणून या जागेचे नाव ‘गौचर’ पडले.

आज पूर्ण वेळ बसमधे बसूनच प्रवास होता. निसर्गाचे नाना परीचे सुंदर आविष्कार बघत मजेत प्रवास सुरु होता. मधे एका जागी दरड कोसळल्याने थांबावे लागले. कड्याचे कोसळलेले दगड–माती दरीत लोटून रस्ता मोकळा करण्याचे काम सुरु होते. तोपर्यंत फोटो–गप्पा सुरु असतानाच कळले की, मागून येणाऱ्या आमच्या ग्रुपच्या छोट्या कारच्या समोरच्या काचेवर दगड पडून ती फुटलीय. ड्रायव्हर गाडी हळूहळू चालवत येतोय. मग ती गाडी आल्यावर त्यातल्या प्रवाशांना टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये ॲडजेस्ट करुन बसवले. समोरची पूर्णच काच गेल्याने जोरदार वाऱ्याचा मारा सहन करत ड्रायव्हर व गाईड अशी जोडगोळी हळूहळू जोशीमठापर्यंत आली. ह्यांनी ड्रायव्हिंग सोपे जावे म्हणून ड्रायव्हरला डे–नाईट गॉगल दिला. दुपारी जेवायला जोशीमठला थांबलो. याचे खरे नाव ‘ज्योतिर्मठ’. आदी शंकराचार्यांना तपश्चर्येनंतर इथेच ‘ज्योतिर्दर्शन’ झाले. वयाच्या अकराव्या वर्षी केरळमधल्या कालडीहून येथे येऊन, श्रीशंकराचार्यांनी तपश्चर्या केली. हिंदू धर्म! बौध्द आदी धर्मांमुळे नामशेष व्हायच्या मार्गावर होता; त्याचे पुनरुज्जीवन देऊन रक्षण केले. धन्य ते महान आचार्य! त्यानीच केदारनाथचा जीर्णोध्दार केला. बद्रीनारायणाची नारदकुंडात फेकून दिलेली मूर्ति, परत मंदिरात आणून तिची प्रतिष्ठापना केली. भारताच्या चार टोकांना चार धर्मपीठे स्थापन करुन, हिंदू धर्माला नवजीवन दिले. धन्य धन्य ते श्री आदीशंकराचार्य !

जोशीमठला हवेतला गारवा चांगलाच जाणवत होता. इथल्या गेस्टहाऊसमधले जेवण खूपच रुचकर होते. थंड हवा अन् हिमशिखरांची हवीहवीशी वाटणारी संगत आता परत सुरु झाली होती. आता छोट्या गाडीचा ड्रायव्हर तिची काच बसवण्यासाठी ती गाडी घेऊन गेला. मग टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये सगळे मिळून १३+२ असे १५ जण ॲडजेस्ट करुन बसलो. बद्रीनाथला जाणारा रस्ता एकेरी वाहतुकीचा आणि दुर्गम आहे. दुतर्फा बर्फाचे ढीग आणि दूरवर खुणावणारी बर्फाच्छादीत शिखरं ह्यांची साथसंगत परत सुरु झालीए. आता तर गाडीत बसून खिडकीमधून ती दृश्य पाहताना छानच वाटत होतं.

अनेक ठिकाणी बर्फाचे कडे व त्याच्या मधून वाहणारे पाणी असं दृश्य दिसत होते. हे असे बर्फाचे कडे वरून घट्ट दिसतात, पण आतून ठिसूळ झाल्याने धोकादायक असतात. असेच रमतगमत थेट ‘देवलोका’ त पोचलो. हे बद्रीनाथचे ऋवतछ चे गेस्टहाऊस देवळाजवळच आहे. फ्रेश झालो, इथेही तिरुपतीप्रमाणे पण विनामूल्य दर्शन कूपन काढावे लागते. अशी ५ वाजताची सर्वांची कूपने काढून गाईडने आणून दिली. मग लगेचच दर्शनाला गेलो. विष्णूचे हे मंदिर भव्य व दिमाखदार आहे. विशेषत: केदारनाथच्या शंकराच्या साधेपणामुळे हा थाटमाट अधिक जाणवला. रात्री पूर्ण मंदिरावर रोषणाई करतात. इथेही मंदिराजवळ खाली ‘तप्तकुंड आहे. त्या छान वाफाळल्या गरम गरम पाण्यात स्नान करुन, देवाच्या दर्शनाला जायचे. येथेही स्त्री–पुरुष स्वतंत्र व्यवस्था आहे. आम्ही दर्शनासाठी फक्त पाय बुडवून मग रांगेत उभे राहीलो. बाहेरुन; पण, छान दर्शन झाले.

क्रमशः



**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स



(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय



आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)

सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

SHREE ANNAPURNA CATERERS

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४

दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८

Website : www.shrutimangal.com   E-mail : hrishikesh@shrutimangal.com

# ‘कॅन्सर माझा सांगाती’

**सौ. आरती अ. हळबे.**

**शब्दांकन – श्री. अविनाश हळबे**

**(क्रमशः पुढे चालु)**

**२ ऑक्टोबर २००५! ऑपरेशनचा दिवस उजाडला. पहाटेच आमचे जवळचे नातेवाईक व मैत्रिणीही हॉस्पिटलमध्ये आल्या. पण, मी एव्हाना मनाने इतकी भक्कम झाले होते की ऑपरेशन थिएटरमध्ये जाताना स्ट्रेचरवर पडल्या पडल्या सर्वांना ‘‘आलेच’’ असे म्हणत हात हलवून बायबाय केले व माझे दैवत शेगावचे श्रीगजानन महाराज यांची प्रार्थना करत ॲनेस्थिटिस्टची सुई टोचून घेतली. काही क्षणांत माझे भान हरपले व डॉ. शैलेश पुणतांबेकरांचे कुशल हात शस्त्रक्रिया करु लागले. तासाभराने डॉ. शैलेश थिएटरमधून बाहेर आले व त्यांनी ऑपरेशन यशस्वी झाल्याची बातमी दिली. याबरोबरच सर्व नोडस् निगेटिव्ह आढळल्याने ऑपरेशननंतर रेडिएशन अथवा केमोथेरपीची ट्रीटमेंट घ्यावी लागणार नाही.**

दुःखाचा आघात कितीही मोठा असला तरी, त्यातून लवकरात लवकर बाहेर येणे भाग होते. समोर दोनच मार्ग दिसत होते. एक म्हणजे ही कॅन्सरपुढे हार मानून मृत्यूला शरण जाणे आणि दुसरा म्हणजे परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेऊन, पण जास्तीत जास्त वैद्यकीय उपाय करुन त्याच्याशी यशस्वी सामना करणे. आम्ही दोघांनी थोडा विचारविनिमय केला. ही गोष्ट जगापासून लपवून काहीच फायदा होणार नव्हता. कारण कॅन्सर होणे म्हणजे कोणतीही लाजीरवाणी गोष्ट किंवा काही गुन्हा नव्हता जो जगापासून लपवावा. उलट जगाला विश्वासात घेतले तर, त्यांचा पाठिंबा व सर्व प्रकारची मदत मिळण्याची शक्यता जास्त होती. परमेश्वराची प्रार्थना आणि त्याबरोबरच वैद्यकीय उपचारात कमतरता करायची नाही असेही ठरविले. मी आणि अविनाशनी दुसरा मार्ग निवडला आणि ते सकारात्मकतेकडे टाकले गेलेले पहिले पाऊल ठरले!

सुदैवाने प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करणारे डॉ. शैलेश पुणतांबेकर यांचे काका डॉ. सतीश पुणतांबेकर व त्याची पत्नी डॉ. संजीवनी हे आमच्या जवळच्या नात्यातले होते. या दोघांनाही या गोष्टीची कल्पना देऊन आम्ही आमच्या घरी बोलविले. त्यांनी ‘ब्रेस्ट कॅन्सर सर्जरी’ हा एकूण प्रकार काय आहे, हे नीट समजावून, असे पेशंट ऑपरेशननंतरही वीस–वीस वर्षे व्यवस्थित जगू शकतात, हे सोदाहरण सांगून माझे आत्मिक बळ वाढवले. ही सर्व चर्चा मुद्दाम मुलांसमोरच करण्यात आली. त्यामुळे काही प्रमाणात का होईना, पण मुलेही सावरली. अविनाशने नंतर आपले नातेवाईक व शेजारीपाजारी यांना क्रमाक्रमाने बोलावून हे सांगायला सुरवात केली. प्रथम उलटीच प्रतिक्रिया घडे. मला कॅन्सर झालाय हे ऐकताच त्यांना प्रचंड धक्का बसे. महिला तर रडायला लागत. मग मला व अविनाशनाच त्यांची समजूत काढावी लागे! हा प्रकार फारच विचित्र होता, पण त्यांचे गैरसमज दूर झाल्यावर मात्र नातेवाईक व



शेजारी यांनी आमच्या मागे मनोधैर्याची एक भक्कम फळी उभी केली. सकारात्मककडे हे दुसरे पाऊल होते!

२ ऑक्टोबर २००५! ऑपरेशनचा दिवस उजाडला. पहाटेच आमचे जवळचे नातेवाईक व मैत्रिणीही हॉस्पिटलमध्ये आल्या. पण, मी एव्हाना मनाने इतकी भक्कम झाले होते की ऑपरेशन थिएटरमध्ये जाताना स्ट्रेचरवर पडल्या पडल्या सर्वांना ‘‘आलेच’’ असे म्हणत हात हलवून बायबाय केले व माझे दैवत शेगावचे श्रीगजानन महाराज यांची प्रार्थना करत ॲनेस्थिटिस्टची सुई टोचून घेतली. काही क्षणांत माझे भान हरपले व डॉ. शैलेश पुणतांबेकरांचे कुशल हात शस्त्रक्रिया करु लागले.

तासाभराने डॉ. शैलेश थिएटरमधून बाहेर आले व त्यांनी ऑपरेशन यशस्वी झाल्याची बातमी दिली. याबरोबरच सर्व नोडस् निगेटिव्ह आढळल्याने ऑपरेशननंतर रेडिएशन अथवा केमोथेरपीची ट्रीटमेंट घ्यावी लागणार नाही, अशी बातमी सांगून सर्वांचा आनंद द्विगुणित केला. रेडिएशन आणि केमोथेरपी हे काय प्रकार आहेत हे नीट माहिती नसूनही थिएटरबाहेरच्या सर्वांना मनापासून आनंद झाला. सकारात्मकतेचे तिसरे पाऊल आता दैवानेच टाकले होते!

काही वेळाने मी शुद्धीवर आले. अविनाशने रेडिएशन व केमोथेरपीची ट्रीटमेंटही घ्यावी लागणार नाही, हे सांगून मला काहीसा दिलासा दिला. ऑपरेशनमुळे दुखऱ्या भागात वेदना होत होत्या तरी, एका दिव्यातून निभावून निघाल्याने मला बरेही वाटते होते.

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S. Max Distance between spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance (Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range | rpm | (8)75-1850 | (8) 80-2310 |
| Vertical adjustment of arm | mm | 533 | 660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in



सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

काटदरे

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!

## चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची, उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला, ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

# काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

होता होता रात्र झाली आणि एकदम मला आठवण झाली. आज २ ऑक्टोबर म्हणजे अविनाशचा वाढदिवस! माझ्या कॅन्सरच्या दुखण्याची बातमी कळल्यापासून आम्हा सर्वांचेच याकडे दुर्लक्ष झाले होते. पण, मुले मात्र हे विसरली नव्हती. त्यांने पटकन कुठुनतरी केक आणला हॉस्पिटलमध्ये रात्री १०.३० वाजता केक कापून डॉक्टरांसकट सर्वांनी अविनाशचा वाढदिवस साजरा केला! सकाळी डॉक्टरांनी कॅन्सरची गाठ कापली व मला नवजीवनाचे 'प्रेझेंट' मिळाले, तर रात्री अविनाशने वाढदिवसाचा केक कापला आणि माझ्या रुपात त्याल जगातले सर्वोच्च प्रेझेंट मिळाले! ऑपरेशननंतर माझे पुढे काय होणार आहे याची कल्पना नसूनही, आमच्या आयुष्यातल्या एका आनंदाच्या दिवसाकडे आम्ही पाठ फिरवली नाही. सकारात्मकतेचे हे चौथे पाऊल होते! घरी आल्यावर उर्वरित नातेवाईक/हितचिंतकांचा ओघ सुरु झाला. पण त्यांना कॅन्सरबद्दल नीटशी माहिती नसल्याने, काही मंडळी बोलताना 'कॅन्सर म्हणजे जगणे कॅन्सल' या भावनेने नकळत निरवानिरवीची भाषा बोलत. माझ्याकडे बघताना 'हे आरतीचे अखेरचे दर्शन' अशा रीतीने पहात होते. असे करताना आपण किती मोठी घोडचूक करतोय याची त्यांना गंधवार्ताही नसे. नाही म्हटले तरी या गोष्टीचा माझ्या मनावर हळूहळू परिणाम होऊन, मनोधैर्य थोडे ढासळू लागले. नेमके याच वेळी मला ''आस्था ब्रेस्ट कॅन्सर सपोर्ट'' ग्रुपची माहिती मिळाली. त्यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांच्या कार्यकर्त्या माझ्या घरी आल्या. त्यांनी स्वत:ची व आस्था ग्रुपच्या अनेक सभासद स्त्रियांची नावानिशी उदाहरणे देऊन, कॅन्सरच्या ऑपरेशननंतरही स्त्रियांना पहिल्यासारखे जीवन जगता येते हे पटवून दिले व माझ्या मनाला पुन्हा उभारी आणली. ही उभारी इतकी मिळाली, की मी नंतर त्यांच्या सभांना आवर्जून जाऊ लागले. हे सकारात्मकतेकडे टाकलेले पाचवे पाऊल ठरले. हा ग्रुप जॉईन करण्याचा निर्णय, माझ्या जीवनाला आणखी कलाटणी देणारा ठरला. कारण इथे नुसत्या सभा, बैठकी नसून हा ग्रुप अशा तऱ्हेच्या अनेक कॅन्सरपीडितांना वारंवार भेटी देऊन काउन्सिलिंगद्वारे त्यांच्या खचलेल्या मनांना उभारी आणण्याचे काम करत होता. कण्हत, कुंथत, जगापासून स्वत:ला दूर ठेवत जीवन जगणाऱ्या आपल्या भगिनींना पुन्हा माणसात आणत होत्या. त्यांच्यासाठी निरनिराळी संमेलने, नाटके, अवेअरनेस प्रोग्रम्स आयोजित करत होत्या. मग मीही त्यात सामील झाले.

इथे मला माझ्यातला एक सुप्त गुण सापडला. तो म्हणजे हसत खेळत, पण मुद्देसूदपणे समोरच्या व्यक्तीस आपले म्हणणे सकारात्मक रीतीने समजावून देण्याचा उर्फ काउन्सिलिंग करता येण्याचा! या गुणाच्या रुपाने मला जणू अलिबाबाची गुहाच सापडली. माझा हा गुण लक्षात येताच मी अशा प्रकारच्या कॅन्सरपीडित स्त्रियांच्या मनाला आणि जीवनाला नवी उभारी देण्यासाठी काउन्सिलिंगला जाण्यास सुरवात केली. 'घायालकी गती घायाल जाने' या न्यायाने एक कॅन्सर पेशंटच दुसऱ्या कॅन्सरग्रस्त पेशंटला परिणामकारक रीतीने समजाऊन सांगू शकतो हा अनुभव फारच बोलका ठरला.

उपास्य दैवतावर श्रद्धा,सकारात्मक विचारसरणी, कुटुंबीय आणि हितचिंतकांचा आधार यामुळे मी या सर्व दुष्टचक्रातून बऱ्यापैकी बाहेर येऊ शकले खरे, पण या गोष्टी सर्वांना मिळतातच असे नाही. उलट कॅन्सरच्या बाधेपेक्षा त्याच्या भीतीनेच बहुतांशी रोगी आणि त्यांचे नातेवाईक जास्त खचून जातात असे आढळून आल्याने, मी कॅन्सरविषयक मदतकार्य आणि समुपदेशनाचे काम आणखी जोमाने सुरु केले. हे सकारात्मकतेकडे टाकलेले सहावे पाऊल ठरले.

ब्रेस्ट कॅन्सरच्या ऑपरेशननंतर, काही स्त्रियांना ऑपरेशन झालेल्या बाजूचा हात प्रचंड प्रमाणात सुजून मल्लखांबासारखा टणक आणि जड होण्याचा त्रास होतो. याला ''लिंफेडिमा'' असे म्हणतात. याही बाबतीत बऱ्याच पेशंटस्ना नीट माहिती नसते. ही सूज कमी करुन हात पुन्हा हलका करण्याची ट्रीटमेंट एका विविक्षित यंत्राद्वारे देता येते. या ट्रीटमेंटचे डेमॉन्स्ट्रेशन देण्यासाठी आस्था ग्रुपने एक शिबिर आयोजित करण्याचे ठरविले. मी शिबीराची संपूर्ण जबाबदारी अंगावर घेऊन हिरीरीने ती यशस्वी करुन दाखवली. या शिबिरात डेमॉन्स्ट्रेशन देताना, चाळीस स्त्रियांवर मोफत उपचारही करण्यात आले. या शिबिरातून कॅन्सर पेशंटस्ना काऊन्सिलिंगची किती आवश्यकता असते ते मला आणखी प्रकर्षाने जाणवले.

हे सर्व करत असताना, कॅन्सरबाबत काही गोष्टी सर्वांसमोर यायला हव्यात, गैरसमज दूर व्हायला हवेत असे मला आतून सतत जाणवू लागले. अविनाशच्या मदतीने मी माझ्या अनुभवावर आधारीत असा एक लेख बनवला आणि दै. सकाळच्या 'मुक्तपीठ' या सदरासाठी पाठविला. सकाळने या लेखाला अतिशय सकारात्मक प्रतिसाद देऊन ७ जून २०१० ला हा लेख छापला. पुढे कोल्हापूरच्या ''विश्वपंढरी'' या धार्मिक मासिकाने हा लेख पुनर्मुद्रित केला. हा लेख वाचल्यावर अनेकांनी माझे अभिनंदन तर केलेच पण, अनेक कॅन्सरग्रस्त रुग्णांनी माझ्याशी संपर्क साधून माझ्या समुपदेशनाचा लाभ घेण्यास सुरुवात केली. दैनिक जागरणतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'सिटी प्लस' या इंग्रजी पाक्षिकाने आणि 'डीएनए' नेही माझी मुलाखत घेऊन छापली. याबरोबरच 'स्टार माझा' नेही जागतिक कॅन्सर दिनानिमित्ताने माझी मुलाखत प्रसारित केली. सकाळमधूनही माझी आणखी एक मुलाखत प्रसिद्ध झाली. यात माझा मोबाईल नंबरही दिला होता, ज्याचे रुपांतर मी हेल्पलाईनमध्ये केले. या सर्व गोष्टींमुळे आणखी अनेक पेशंटस् माझ्याशी संपर्क साधू लागले. हे सर्व पाहिल्यावर, माझे कॅन्सरचे ऑपरेशन करणारे डॉ. शैलेश पुणतांबेकर यांनी जुलै २०१० मध्ये मला बोलावून त्यांच्या 'गॅलक्सी केअर लॅप्रोस्कोपि इन्स्टिट्यूट' या मोठ्या हॉस्पिटलमध्ये कॅन्सर पेशंटस्ना काऊन्सिलिंग करण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली. त्यासाठी तिथेच एक सुसज्ज केबीनही मला देण्यात आली.

सुरुवातीस आठवड्यातून एक दिवस व काही काळातच आठवड्यातून दोन दिवस मी तिथे जाऊन कॅन्सरग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना समुपदेशन करुन, कॅन्सरबाबतचे गैरसमज दूर करुन, त्यांच्या मनातली मृत्यूची भीती घालवून, कॅन्सरच्या ट्रिटमेंटनंतरही दैनंदिन जीवन कसे व्यवस्थित जगता येते हे स्वत:च्या उदाहरणातून सांगण्यास सुरुवात केली. या समुपदेशनासाठी फी घ्यावी का असा प्रश्नच उपस्थित झाल्यावर अविनाशनी 'आपल्या घरावर साधुसंतांची कृपा आहे. संत हे द्यायला आलेले असतात! घ्यायला नाही. मग आपण त्यांच्या शिकवणीचे थोडेतरी अनुकरण करायला नको का?' असा विचार मला सांगितला. याबरोबरच, कॅन्सर ट्रिटमेंट किती खर्चिक असते हे माहित असल्याने, पेशंटस्ना खर्चाच्या बाबतीत थोडातरी दिलासा मिळावा हा विचार आम्ही केला.

क्रमशः

## ॥ संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ डोंबिवलीच्या** २०१३ सालच्या संक्रांत संमेलनाचा वृत्तांत

रविवार दि. २०.१.१३ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळाच्या 'समाज-मंदिर' मध्ये संक्रांत संमेलन संपन्न झाले.

श्री. नाखरे गुरुजींनी सौरस्तोत्राने कार्यक्रमाची सुरेल सुरुवात केली.

संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त मेजर जनरल, श्री. शशिकांत पित्रेसाहेब उपस्थित होते. त्यांच्या हस्ते I.P.S. अधिकारी श्री. प्रमोद फळणीकर यांचा सत्कार झाला. तसेच पुणे येथील वेदमूर्ती घनपाठी श्री. वामन पुंडलीक हळबे, यांचा, त्यांनी केवळ २० व्या वर्षी घनपाठाचे शिक्षण घेऊन ''घनपाठी'' ही पदवी मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार वयोवृद्ध श्री. नवरे गुरुजी यांच्या हस्ते केला.

या वर्षीपासून ज्ञातीबाहेरील एका प्रथितयश डोंबिवलीकरांचा सन्मान करावा, असे कार्यकारिणीने ठरवले. या वर्षी तो सन्मान, गेली तेरा वर्षे टाटा उद्योगसमूहातर्फे दूर संचार क्षेत्रांत कार्यरत असलेल्या, श्री. माधव जोशी यांना प्रदान करण्यात आला.

तसेच आपल्या ज्ञातीतील एक तबलावादक श्री.प्रविण करकरे व 'सुरुची केटरर्स'च्या एक भागिदार सौ. भाग्यश्री प्रभुघाटे, यांचा ही सत्कार मान्यवरांच्या हस्ते झाला. दरवर्षीप्रमाणे 'विद्यार्थी गुण गौरव' व महिला मंडळाची स्पर्धेची बक्षिसे देण्यांत आली. सत्कारार्थींनी थोडक्यांत सत्काराला उत्तरे दिली. कार्यध्यक्षांच्या मनोगतानंतर केदार पाध्ये यांनी सर्वांचे आभार मानले.

मध्यतरांत कॉफीपान झाले. मध्यंतरानंतर श्री. पित्रे, श्री. फळणीकर व श्री. माधव जोशी यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला. सौ. वैशाली टोकरे यांनी या तिघांनाही अनेक प्रश्न विचारुन मुलाखत प्रवाही ठेवली. व त्यांचे सामाजिक व खाजगी जीवन छान प्रकारे उलगडून दाखवले. पसायदानाने कार्यक्रमाची व सशुल्क भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**स्वाती प्रभुदेसाई**
**डोंबिवली.**

---

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बेळगावचा तिळगूळ समारंभ** दि. १० फेब्रुवारीला देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या समर्थ भुवन या हॉलमध्ये साजरा झाला. अध्यक्षस्थानी श्री. चंद्रशेखर जोशी होते. प्रारंभी भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे माजी अध्यक्ष डॉ. कमलाकर श्रीखंडे यांना श्रद्धांजली वाहाण्यात आली. स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष श्री. जोशी यांनी केले. त्यात त्यांनी भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या सभेची माहिती दिली. महासंघाची घटना-दुरुस्ती, संपर्क त्रैमासिकाची माहिती व रजिस्ट्रेशन, महासंघाची आर्थिक स्थिती इ. विषयी माहिती दिली. आपल्या संघाचा शैक्षणिक निधी, वधु-वर मेळावा, सामुहिक पुंजी यांची माहिती दिली. बेळगावला होणाऱ्या बेळगांव जिल्हा अखिल ब्राह्मण समाजाच्या अधिवेशनाविषयी झालेल्या सभेचा वृत्तांत सांगून सर्वांनी सहकार्य करावे, असे सांगितले. त्यानंतर वरिष्ठ सभासदांना गौरवण्यात आले. त्यामध्ये श्री. मनंतराव व सौ. शोभा हेर्लेकर यांच्या श्री. व सौ. कानेटकर यांनी श्रीमते नलिनी गर्दे व श्री.विठ्ठलराव जोशी यांच्या श्री सौ. पी. जोशी यांनी यांचा सौ. अपर्णा जोशी यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार केला. हिंदुस्थानी व कर्नाटकी संगीतातेल काही मोजक्या रागांवर संगीत कार्यक्रम करण्यात आला. सौ. भारती भट व सौ. गुर्जर यांनी प्रत्येक रागावर लोक गीत गाऊन रागाची माहिती दिली. साथीला श्री. यशवंत बोंद्रे व श्री. पालकर होते. यानंतर श्री. सुहास गुर्जर यांनी पोष्ट ऑफीसमुळे सर्व सभासदांना निवेदन पाकीटने पोहोचतात, व बेळगांव समाचारामुळे आपल्याला वेळच्या वेळी पत्रके पोहोचतात हे सांगितले व यापुढे सर्व निवेदन 'बेळगांव समाचार' मधूनच सर्वांना पाठविली जातेल हे स्पष्ट केले.

महाभारतातील युद्धातल्या कर्णाच्या आयुष्यात आलेल्या प्रसंगातील आधारावर एक नाटक सादर करण्यात आले. येथील पात्र निवड व पोशाख आणि पात्रांचा जिवंत अभिनव यामुळे हे नाटक सुंदर रंगले. सर्व कलाकारांचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यानंतर श्री. गिरीष कानेटकर यांनी आभार प्रदर्शन केले. सर्व नागरिकांचे सूत्र-संचालन कु. ऋचा जोशी हिने केले. प्रीती भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सुमारे ११० सभासदांनी भाग घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. राजा जोशी, सौ. रूपा बोंद्रे, श्री.सुहास गुर्जर, श्री. व सौ. कानेटकर व श्री. व सौ. जोशी यांनी कष्ट घेतले.

**संघातर्फे या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा !**

१) सौ. शिवानी उपाध्ये : मंथन काव्य रचना स्पर्धेमध्ये दुसरा नंबर मिळविल्याबद्दल त्यांना शुभेच्छा!

२) कु. अक्षता उपाध्ये : सायन्स क्वीझ स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम, राज्यात तिसरा व अखिल भार्तीय स्पर्धेत दहाव नंबर मिळविल्याबद्दल.

३) सौ. नीना जठार :

४) कु. पुष्कर अंकिलकर :

१) १६ नोव्हेंबर रोजी झालेल्या नॅशनल लेव्हल ओपन कराटे चँपियनशीप कराटेमध्ये तिसरा नंबर. २) डिसेंबर १२ रोजी उडपी येथष झालेल्या इंटर डोजो कराटे २०१२ करामध्ये प्रथम व कुनिटेमध्ये तृतीय क्रमांक. ३) जानेवारी ६ रोजी शिमोगा येथे साऊथ इंडियन इनिव्हटेशनल कराटे चँपियनशीप करामध्ये प्रथम व कराटेमध्ये प्रथम.

५) कु. प्रतिक अंकिलकर : १) नोव्हेंबर १२ रोजी उहपी येथील ६ वा इन्टरसोर चँपियनशीप २०११, करामध्ये द्वितीय (९ वर्षाखालील व कुमिटेमध्ये तृतीय (२० किलो खालील) २) डिसेंबर २२ रोजी उडपी येथे सातव्या स्टेट चँपियनशीप करामध्ये द्वितीय व कुमिटेमध्ये प्रथम.

६) कु. चैतन्य साधले: वि. गो. साठे प्रबोधिनीतर्फे मराठी व्याकरन दहावी इयत्तेच्य विद्यार्थ्यांसाठीच्या स्पर्धेत प्रथम.

१) २०१३-२०१४ साठी ज्यांनी संपर्कची वर्गणी भरली नाही, त्यांनी श्री.सी. पी. जोशींकडे लवकरात लवकर भरावी. २)'संपर्क' मध्ये जाहिरात देऊन महासंघाला मदत करावी. ३)आपल्या संघाची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासाठी ज्यांना मदत द्यायची आहे, त्यांनी चेक द्यायचा असल्यास 'कऱ्हाडे ब्राह्मण संघ' बेळगांवच्या नावाने द्यावा.

## ॥ संस्था वृत्त

**रत्नागिरी कऱ्हाडे ब्राह्मण सह. संघाचा** दरवर्षी करण्यात येणारा पुरस्कार वितरण समारंभ, रविवार दि. ३/३/२०१३ रोजी संघाच्या राणी लक्ष्मीबाई सभागृहात सायंकाळी ४-०० वाजता आयोजित करण्यात आला होता.

या समारंभाची सुरुवात वेदमंत्रपठणाने करण्यात आली. वेदमंत्रांच्या घोषाने सभागृहातील वातावरण मंगलमय झाल्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत उद्धव हळबे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुणे व उपस्थित सर्वांचे स्वागत केले. समारंभाचे प्रमुख पाहुणे डी.बी.जे. महाविद्यालय चिपळूणचे प्राचार्य डॉ. श्याम जोशी यांचा परिचय डॉ. श्रीकृष्ण जोशी यांनी करुन दिला. त्यानंतर डॉ. श्याम जोशी यांचा श्री. हळबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




**डावीकडून ह.भ.प. नारायण द.केळकर, वे. मु. अवधूत द. साठे, डॉ. अलिमियाँ दा. परकार, संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत उ. हळबे, श्री. महेश ग. शिवलकर आणि श्री. प्रकाश ग. पाध्ये बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. श्याम जोशी**

संघामार्फत दरवर्षी समाजातील विविध स्तरात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा विविध पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षी डॉ. श्याम जोशी यांच्या हस्ते वे.मु.श्री. अवधूत दत्तात्रय साठे, देवरुख यांना आदर्श पौरोहित्य पुरस्काराने श्री. प्रकाश गजानन पाध्ये, कोंडतिवरे (राजापूर) यांना आचार्य नारळकर पुरस्काराने श्री. महेश गजानन शिवलकर, राजापूर यांना दर्पण पुरस्काराने, डॉ. अलिमियाँ दाऊद परकार, रत्नागिरी यांना धन्वंतरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावर्षीच नव्याने आदर्श कीर्तनकार पुरस्कार सुरु करण्यात आला. त्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी, चिपळूणचे ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. नारायण दत्तात्रय केळकर ठरले. सर्वांना पुरस्कार प्रदान करुन झाल्यानंतर त्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली.

याच कार्यक्रमात या पूर्ण वर्षभरात ज्यांना वेगवेगळे पुरस्कार मिळाले असतील किंवा ज्यांनी काही उल्लेखनीय कामगिरी केलेली असेल त्यांनाही गौरविण्यात येते. त्यामध्ये संघाचे माजी अध्यक्ष श्री. द.वि. तथा तात्या ठाकुरदेसाई, सौ. सुमन ठाकुरदेसाई, सौ. वृषाली आठल्ये, श्री. सुनिल जठार आणि श्री. आनंद प्रभुदेसाई यांनाही गौरविण्यात आले.

श्री. तात्या ठाकुरदेसाई यांना पुणे येथे 'देशभक्त शंकरराव देव' पुरस्कार पुणे येथे मिळाल्याबद्दल, सौ. सुमन ठाकुरदेसाई यांना पं. दादासाहेब ज क ा त द ा र प्रतिष्ठानतर्फे पुणे येथे मंदाश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल, सौ. वृषाली आठल्ये यांना रविकिरण मंडळ सांगली यांचा 'साहित्य श्री.' पुरस्कार व कोमसापचा वि.सी. गुर्जर स्मृती पुरस्कार मिळाल्याबद्दल, श्री. सुनिल जठार यांना रविकिरण बहुउद्देशीय संस्था सांगली यांचा 'समाजश्री' पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि श्री. आनंद प्रभुदेसाई यांना संगीत राज्य नाट्य स्पर्धेतील 'कट्यार काळजात घुसली' या नाटकासाठी संगीत अभिनयाचे 'रौप्य पदक' आणि कोरेगावचा 'छोटा गंधर्व' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा प्रा. डॉ. श्याम जोशी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या संपूर्ण कार्यमक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रतिभा प्रभुदेसाई यांनी केले; तर आभारप्रर्शन श्रीमती शुभांगी मुळ्ये यांनी केले.

अल्पोपहार आणि कॉफीपानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला, लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कारण डॉ. श्याम जोशी यांचे संवेदनशील पालकत्व आणि समाजाची बधीर अवस्था या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याविषयी बोलताना ते म्हणाले, आपल्या आजुबाजुला अनेक घटना घडत असतात. परंतु आपण त्यांच्याकडे पाहुनही दुर्लक्ष करीत आहोत. समाजाची एकंदरीत अवस्थाच बधीर झाली आहे. आजची समाजाची अवस्था संवेदनाहीन झाली असून, ती स्थिती अतिशय चिंताजनक झाली आहे. आहार, व्यायाम आणि झोप यांकडे पुरेसे लक्ष द्यायला कोणालाही वेळ नाही. निसर्गात रममाण व्हायला कोणाला वेळ देता येत नाही. नोकरीच्या ठिकाणी कामाची व्याप्ती वाढते आहे. कामाचे तास वाढतायत त्यामुळे आरोग्याकडे पहायला वेळ मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. यावर उपाय म्हणजे प्रत्येक पालकाने संवेदनाहीन न राहता संवेदनशील बनले पाहिजे. म्हणजे समाजातील बधीर अवस्था आपोआपच कमी होण्यास मदत होईल.


### जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पुर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |

## संस्था वृत्त

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर वृत्तांत –** कोल्हापूर शाखेतर्फे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त्य विविध उपक्रम धुमधडाक्यात सुरु आहेत. दरमहा किमान दोन कार्यक्रमांची मेजवानी सदस्यांना मिळत आहे.

जानेवारीत रौप्य महोत्सव समिती अध्यक्ष श्री.आर. डी. दीक्षित यांनी सादर केलेली नॉर्वे, अलास्का दौऱ्यावरील ध्वनीचित्रफीत सर्वांनाच संस्मरणीय ठरली. तसेच प्रख्यात दिवंगत गायक वसंतराव देशपांडे यांच्यावरील नक्षत्रांचे देणे, ही ध्वनीचित्रफितही सभासदांना दाखवण्यात आली.

फेब्रुवारीत अमेरिकास्थायिक ऑर्थोडेंटिस्ट डॉ. अभिजीत प्रकाश गुणे यांनी संघाला सहकुटुंब भेट दिली. पाश्चात्य जगातील दंत आरोग्यासंबंधित जागरुकता यांवर त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच संघाला पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी ॲक्वागार्डही प्रदान केला. त्यांवर सदस्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

जानेवारी व फेब्रुवारीत संघातर्फे दंतचिकित्सा व नेत्रचिकित्सा अशी दोन आरोग्य शिबीरे झाली. डॉ. यशवंत तळवलकर, डॉ. सुश्रृत हर्डीकर, डॉ. सतेज देसाई व डॉ. अमिता हर्षे आदि डेंटिस्ट आणि डॉ. आनंद ढवळे, डॉ. चंद्रशेखर खानवेलकर हे नेत्ररोग तज्ञ आदि आपल्या समाजबांधव सभासदांनी ही संघकार्ये उत्कृष्ठपणे पार केली. शिबीरे सर्वांसाठी खुली ठेवली होती. त्यामुळे प्रतिसाद भरघोस मिळाला. कार्यकारिणी सदस्य जातीने मदतीस हजर होते.

आठ मार्चला महिला दिनानिमित्त पुण्याच्या वाल्मिक ॲग्रोटेक कंपनीच्या अध्यक्षा व प्रथितयश शेतकरी सौ. सुखदा संजय ठाकूर यांची शेतीतून स्वत:चा शोध या विषयावर सौ. शीतल महाजनी यांनी प्रकट मुलाखत घेतली. यावेळी श्री. संजय ठाकूर यांनीही उद्योग विश्वातील अनुभव सांगितले. कार्यक्रमांस सभासदांची प्रेक्षणीय दाद मिळाली. संघातर्फे अध्यक्ष सौ. अनुराधा गुणे, उपाध्यक्षा श्रीमती शांता पाध्ये, कार्यवाह सौ. दीपश्री जोशी तसेच महिला समिती अध्यक्ष सौ. शीतल महाजनी आदि प्रमुख महिला संचालकांचेही सन्मान करण्यात आले.

दि. ११ मार्च, २०१३ रोजी प्रख्यात वक्ते डॉ. सच्चिदानंद शेवडे यांची क्रांतीकारी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावरील भाषणाची ध्वनीफित रसिक सभासदांना ऐकवण्यात आली. स्वातंत्र्य समरातील इतर क्रांतीकारकांवरील रसाळ प्रवचने ऐकवण्याचा संघाचा मनोदय यावेळी जाहीर करण्यात आला. त्यांवर उपस्थित सभासदांनी आनंदाने रूकार दिला.

आणि रविवार, दि. १७ मार्च रोजी पुण्याच्या सौ. सुनिता गुणे, श्री.नारायण गुणे व सौ. आसावरी गुणे–करमरकर यांचा गुणी–रंजन हा बहारदार संगीत कार्यक्रम झाला. 'संगीत स्वयंवर' व 'संगीत सौभद्र' या नाटकांवर आधारित त्रिमूर्ती हा कार्यक्रम सौ. सुनिता गुणे यांनी पौराणिक वेशभूषेत प्रवेश व नाट्यगीते यांसह सादर केला. सुमारे दीड तास त्यांचे रंगमंचावर एकपात्री सादरीकरण अखंडपणे झाले. त्यामुळे उपस्थित सानंद आश्चर्यकीत झाले व जणू बालगंधर्वांच्या युगात नेणारे ठरले अशी प्रतिक्रिया व्यक्त केली तर उत्तरार्धात त्यांचे पती श्री. नारायण गुणे व कन्या सौ. आसावरी गुणे–करमरकर यांचेसह भक्तीगीते, भावगीते, लावणी इ. सुगम संगीताचे मनोज्ञ, वैविध्यपूर्ण संगीत सादरीकरण केले. श्रोत्यांना कार्यक्रम खूपच आवडला. श्री.विजय पाटकर (संवादिनी) व श्री. विनायक लोहार (तबला) यांची समर्थ साथसंगत त्यांना लाभली.

या सर्व कार्यक्रमांचे यशस्वी संयोजन अध्यक्ष सौ.अनुराधा प्र. गुणे करीत असून, त्यांना याकामी सौ. शीतल महाजनी, श्री.नितेश जोशी, श्री.धर्मराज पंडित, श्री. अण्णा जावडेकर, श्री. आनंद खेडकर आदि सर्व संचालक–कार्यकारिणी सदस्यांची बहुमोल मदत मिळत आहे.


## सूचना –

१) कृपया आपल्या वर्गणीचे नुतनीकरण योग्यवेळी करा.

२) **कृपया वर्गणी मनिऑर्डरने पाठवू नका.**

३) कृपया आपल्या अंकासंबंधी चौकशी १० तारखेनंतर आपल्या संघ कार्यालयात करा.

४) अंक सर्वांना वेळेवर पाठवले जातात. पण जर आपल्याला अंका १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांचे कार्यालयांत सोमवार ते शनिवार सायंकाळी ५ ते ७ या वेळांत संपर्क साधावा. दुरध्वनी क्र. ०२० ड्ढ २४४३२४४३

५) काही वर्गणीदार बँकेत पैसे भरतात पण आमच्या कार्यालयांस कळवायचे राहून जाते व त्यामुळे आम्हाला ते पैसे कुणी भरले हे कळत नाही व त्यामुळे आपल्याला अंक मिळत नाहीत.

## संस्था वृत्त

### तिळगुळ समारंभ

दि. २०–१–२०१३ रोजी **कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे** चा तिसरा कार्यक्रम तिळगूळ समारंभ साजरा झाला. या दिवशी गायन स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. दुपारी ३.३० वाजता स्पर्धेला सुरवात झाली. स्पर्धेत वय वर्ष ८ ते १६, १६ ते ३२ व ३२ च्या पुढे सर्व, असे तीन गट होते. परीक्षक म्हणून श्री. सुभाष ताटके व सौ. नीलाताई खेर होते. प्रथम गटात कु. मधुरा निखील खांडेकर हीने प्रथम क्रमांक पटकावला; तर दुसऱ्या गटात कु. अनुजा नरेंद्र मुळे हीने बक्षिस मिळविले. तसेच तिसऱ्या गटात स्पर्धक जास्त असल्यामुळे चार बक्षिसे दिली. त्यात प्रथम श्रीमती मेधा करकरे, द्वितीय – सौ. सुखदा शेजवलकर, तृतीय – श्री. मधुकर पंडित व चतुर्थ – श्री. अजित पंडित असे क्रमांक मिळाले. सर्व स्पर्धकांनी सुश्राव्य गाणी सादर केली आणि त्यांना साथ होती, पेटीवर – श्री. श्रीराम दातीर यांची व तबल्यावर श्री. अमित खेर यांची. संगीताच्या कार्यक्रमानंतर अध्यक्षांनी काही विशेष सूचना दिल्या. त्यात संघासाठी ५० खुर्च्या खरेदी करायला देणगी देण्याचे आवाहन होते. तिथे हजर सभासदांनी थोड्याच वेळात स्वेच्छेने देणग्या जाहीर करुन, संघाबद्दलचे प्रेम व्यक्त केले.

त्यानंतर श्रेष्ठ महिला उद्योजिका म्हणून पुरस्कार प्राप्त करणाऱ्या श्रीमती शकुंतला अशोक शिंदे यांचा संघातर्फे सत्कार करण्यात आला. त्यांनीही संघाला देणगीच्या रुपाने मदत केली.

त्यानंतर उपस्थित सर्व वाचकांना हळदी–कुंकू, व आवा आणि तिळगुळ तसेच पुरुषांना तिळगुळ दिला. आवा सौ. सीमा फळणीकर, हर्डीकर यांनी मिळून आणला होता.

त्यानंतर सहकार्यवाहांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले व सगळ्यांनी गरमागरम शेव–उसळीचा आस्वाद घेतला.

---

सालाबादप्रमाणे **कऱ्हाडे ब्राह्मण संघ बडोदे** यांनी २७ जानेवारी २०१३, रविवार रोजी सभासदांसाठी एकदिवसीय सहल आयोजित केली होती. सहलीची ठिकाणं होती. 'झंड–हनुमान', धाबाडुंगरी व आयूर हर्बल लॅब, ताजपूरा आश्रम इ.

सभासदांनी उत्कट प्रतिसाद दिल्यामुळे, संघाला दोन मोठ्या व एक लहान अशा तीन बसेसची व्यवस्था करावी लागली.

सकाळी पावणेसात वाजता तीनही बसेसनी कूच केले. बाहेर भरपूर थंडी असली, तरी बसमधील वातावरण मात्र छान उबदार होत. प्रत्येक जण आपापले सर्व ताण विसरुन सहलीचा प्रत्येक क्षण उपभोगीत होते. बसमध्ये मिळालेला च्याऊ–म्याऊंचा खाऊ तर कित्येकांना परत बालपणात घेऊन गेला. सकाळी नाष्ट्याला मिळालेली भजी व गरमागरम चहा कॉफी वा! आणि काय हवे दिवसाच्या सुरुवातीला...

संपूर्ण दिवसाचा प्रवास अगदी छान, शिस्तबद्ध आणि खेळकर पद्धतीने पार पडला. बरेच नवीन खेळ खेळण्यात आले. जसे की खुर्च्यांशिवायची संगीत खुर्ची आणि क्लॅप अॅट सेवन याच्या जोडीला हाऊसी सारखा खेळ होताच. आपापले वय विसरुन, सर्वजण सहलीची मजा लुटत होते. भरपूर बक्षिसांची लयलूट सर्वांचा उत्साह द्विगुणीत करत होता. सर्वात जास्त कौतुकाचा भाग म्हणजे, 'आयूर लॅबच्या' श्री. मिलींद पुरोहित व श्री. पटवर्धन यांनी दाखविलेला जिव्हाळा व आत्मीयता. एवढ्या मोठ्या कंपनीचे मालक असूनही त्यांनी आम्हांला त्यांचा अमूल्य वेळ दिला. मिलींद पुरोहित आमचे सभासद असल्याचा आम्हांला जो अभिमान होता, तो आणखीनच वाढला. म्हणतात ना शेवटी माणसातली माणूसकीच त्याला मोठं करते. त्याचा सार्थ प्रत्यय आम्हांला आला.

आणि ताजपूरा आश्रमानंतर आली निरोपाची वेळ! सबंध दिवसभराचा थकवा असून देखील सर्वजण तरतरीत दिसत होते. रात्री पावणे दहाच्या सुमारास आमच्या बसेस बडोद्याला परतल्या. एकमेकांचा निरोप घेताना डोळ्यासमोर संपूर्ण दिवसाची चित्रं सरकत होती. प्रत्येक जण घरी जाताना मनाशी हेच ठरवून गेला, की पुढील वर्षी सहलीला यायचे म्हणजे यायचेच.

अशी ही आम्हां कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे यांची एक दिवसीय सहल.

*With Best Compliments from,*

REINDEER

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

*With*
*Best Compliments*
*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,
Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com
Shrikant Sakhalkar 9850130920



## संस्था वृत्त

### विशेष कार्यक्रम – अहवाल

रविवार दि. १७ फेब्रुवारी २०१३ रोजी **कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे** यांनी, महाराणी चिमणाबाई विद्यालय, सलाटवाडा येथे एक नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लष्करी गणवेशाचा ध्यास आणि बालिदानाची आस मनात ठेवून 'विजय किंवा वीरगती' ह्या वृत्तीने सैन्यदलात सामील होणाऱ्या तेजस्वी वीरांच्या स्मरणगाथांचा संगीत दृकश्राव्य कार्यक्रम आयोजीत केला होता.

सादरकर्त्या होत्या पुण्याच्या सौ. अनुराधा प्रभुदेसाई.

सायंकाळी ६:३० वाजता कार्यक्रमाची सुरवात झाली. सर्वप्रथम बडोद्यातील रहिवासी निवृत्त कर्नल श्री. फळणीकर यांची सौ. स्वाति बाकरे (कार्यवाह) यांनी प्रेक्षकांशी ओळख करुन दिली. संघाच्या वतीने कर्नल फळणीकर यांचा सन्मान करण्यात आला. कर्नल फळणीकर १९७१ च्या भारत–पाक युद्धात सक्रीय सहभागी होते. त्यांनी त्यावेळचे त्यांचे रोमांचकारी अनुभव प्रेक्षकांसमोर मांडले. त्याचबरोबर जोशपूर्ण आवाहन केले. त्यानंतर बडोद्यातील दोन शहीद जवान – दिपक आनंदराव पवार व दिवाकर दादुराम फलटणकर यांच्या परिवाराचा संघातर्फे सन्मान करण्यात आला.

ठीक ७ वाजता मुख्य कार्यक्रमास सुखात झाली. सौ. अनुराधा प्रभुदेसाई यांनी त्यांच्या अत्यंत रसाळ व ओघवत्या शैलीत १९९९ मध्ये झालेल्या कारगीलच्या युद्धाची कहाणी, प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर जणू प्रत्यक्ष उभी केली.

अनुराधाताईंच्या वक्तव्यासोबत प्रोजेक्टरवर कारगीलचा बर्फाच्छादित प्रदेश, उत्तुंग हिमशिखरे, कारगीलच्या शहीदांच्या मानात बांधलेला विजयस्तंभ, मोठमोठे रणगाडे, शस्त्रास्त्रे, सुसज्ज सैनिकांचा काफिला, यांचे फोटो त्याचप्रमाणे काही सैनिकांच्या मुलाखतीही दाखविल्या गेल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर कुसुमाग्रजांचे अजरामर काव्य 'अनाम वीरा' गीताच्या स्वरुपात पडद्यावर दाखवले गेले. परमवीरचक्र प्राप्त झालेले संजयसिंग, योगिंदरसिंग त्याचप्रमाणे युद्धात शहीद झालेले मेजर बत्रा वगैरे शूरवीरांच्या गाथा सांगताना स्वत: अनुराधाताईंचा कंठ दाटून येत होताच पण त्या बरोबर सर्व प्रेक्षकांच्याही डोळ्याच्या कडा नकळत ओलावत होत्या.

साधारण सव्वा–नऊच्या सुमारास जेव्हा अनुराधाताईंनी कार्यक्रम संपवला तेव्हा समोर बसलेले ३०० प्रेक्षक अक्षरश: सुन्नपणे आपापल्या खुर्च्यांवर खिळून राहिले होते.

---

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड** – अलिकडेच कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंडची स्थापना झाली व त्या संघाने भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण संघाला संलग्न करुन घेतले आहे.

मुलुंड संघाची स्थापना जानेवारी २०११ साली झाली व त्या संघाने लगेचच चैत्रगौरी हळदीकुंकवाचा समारंभ आयोजित केला. त्यात संघाच्या सदस्यांनी आपले कलागुण उपस्थितांसमोर सादर केले. जून २०११ मध्ये संघाने घटनेचे प्रारुप तयार केले. सर्वसाधारण सभेत घटना मंजूर करुन घेऊन, योग्य त्या कायद्याखाली नोंदणी करण्यासाठी व त्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही सुरु केली.

सप्टेंबर २०११ मध्ये कऱ्हाडे युवकांसाठी सभा घेतली. विवाह मंडळ सुरू केले.

२०१२ मध्ये पुन:श्च गौरी हळदी–कुंकवाचा कार्यक्रम, जून २०१२ मध्ये वार्षिक सर्वसाधारण सभा तर ७/१०/१२ रोजी तरुण गायकांचा कार्यक्रम निधी संकलनाचा भाग म्हणून आयोजित केला.

संघाचे उद्दीष्ट स्वत:ची वास्तू असावी असे आहे व संघाचे सर्व १००–१२५ सभासद निधी संकलनासह सर्व आयोजित कार्यक्रमांस सहकार्य देतात.

भविष्यांत ज्येष्ठ नागरिक, महिला व विशेषकरुन तरुणांसाठीचे प्रकल्प हाती घेण्याचा संघाचा विचार आहे. सध्या संघाचे अध्यक्ष श्री. अविनाश मंडपे व कार्यवाह श्री. श्रीपाद सप्रे आहेत.


**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

## संस्था वृत्त

# तिळगुळ समारंभ

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे** दिनांक ९ फेब्रुवारी २०१३ रोजी श्रुती मंगल कार्यालयात वार्षिक तिळगूळ समारंभ पार पडला.

सुरवातील २३ ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. श्री शिरगावकर जे ९७ वर्षांचे आहेत आवर्जून उपस्थित होते आणि त्यांनी प्रसंगी माईक हातात घेऊन आपले मनोगत व्यक्त करण्याचे औचित्य साधले. त्यानंतर १८ विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. ह्यात १० वी पासून पदव्युत्तर असे अनेक लोक होते. हे सर्व सत्कार अध्यक्ष श्री गुर्जर, उपाध्यक्ष श्री.भोपटकर, कार्यवाह श्री बाक्रे आणि कोषाध्यक्ष श्री. देसाई ह्यांचे हस्ते जाहले.

ह्यानंतर ज्याची सर्व उत्सुकतेने वाट बघत होते त्या गिरीप्रेमी, ह्या संस्थेच्या फिल्म सादरीकरणाला सुरवात झाली. त्या आधी श्री झिरपे ह्यांनी प्रास्ताविक करून संस्थेची माहिती सांगितली आणि ही मोहीम करण्यास किती कष्ट पडले आणि केवळ लोकांच्या पाठिंब्यावरच ही मोहीम पार पडली ह्याचा आवर्जून उल्लेख केला. सुमारे ५० मिनिटांची ही फिल्म म्हणजे आपण जणू काय डिस्कव्हरी वाहिनी पाहत आहोत काय असेच वाटत होते. हिमालयातील गिर्यारोहण म्हणजे कसा जीवावरचा खेळ आहे. ह्याची प्रत्येकालाच जाणीव झाली. प्रत्यक्ष भाग घेतलेले सर्वश्री झिरपे, हर्षे उपस्थित होते. ह्याखेरीज ह्या मोहिमेचे सूत्रधार श्री पळसुले देखील उपस्थित होते. ४०० पेक्षा जास्त लोकांनी ह्या कार्यक्रमाच आनंद लुटला.

सूत्रसंचालन सौ. दीपा सावकार ह्यांनी केले.

आणि शेवटी श्रुती मंगल कार्यालयाच्या सौजन्याने जवल जवळ ४०० जणांनी सुग्रास आणि प्रसंगाला साजेल अशा भोजनाचा आस्वाद घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

---

**सातारा कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे** शहराजवळीत पवित्र व निसर्गरम्य अशा 'कृष्ण धाम'च्या प्रांगणात कऱ्हाडे कुटुंबीयांसाठी सहल व वनभोजनाचा कार्यक्रम नुकताच झाला. बाळासाहेब भाटे यांच्या प्रास्ताविकानंतर 'कृष्णधाम'चे विश्वस्त बाळासाहेब चावरे यांनी या ठिकाणाची महती सांगून इतर विकासकामांची माहिती दिली.

भोजनोत्तर सत्रात उपस्थितांपैकी अनेकांनी अभंग भक्तिगीत, भावगीत गायन असे विविध कार्यक्रम सादर केले, तसेच डॉ.उमेश करंबेळकर यांनी काही मराठी शब्दांबाबतची मनोरंजक माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशवंत पंडित, विजयराव बाकरे, हेमंत किरकिरे, प्रकाश शहाणे, प्रदीप आचार्य, मानसी मोघे, सौ. वेधाली आगटे आदींनी परिश्रम घेतले.


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टॅंक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे - ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी
घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा